# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ३१३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०६/२०१८

**१) वेगवेगळया तिन्ही घरातुन सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :—**

दिनांक १७/०६/२०१८ चे २१.०० ते १८/०६/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे मागील दाराचा कडीकोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेली लोखंडी आलमारीतुन १ सोन्याचा मंगळसुत्र १५ ग्रॅम, १ सोन्याची चैन १५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याचे २ नथ ३/३ ग्रॅम व नगदी ५२,०००/—रु. असा एकुण १,३४,०००/—रु. चा माल तसेच फिर्यादीच्या मोहल्यातील राहणारे ओमप्रकाश धुर्वे याचे घराचे मागील दाराची कडीकोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या लोखंडी गोदरेज आलमारीतुन लॉकर मध्ये ठेवलेले ३ चैन सोन्याचे वजन ३० ग्रॅम, ३ सोन्याचे अंगठी वजन २० ग्रॅम, ४ बाऱ्या सोन्याच्या वजन १० ग्रॅम, १ काळी पोत सोन्याची वजन २५ ग्रॅम, १ सोन्याची गाठी वजन २.५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ४ ग्रॅम, व नगदी ६२,०००/—रु. व बहीनीच्या पर्स मधुन १५,००/—रु. नगदी असा एकुण २,५०,५००/—रु. चा माल तसेच सुभाष पिकलमुंडे यांचे घराची कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरातील गोदरेज आलमारीतील नगदी ५,००/—रु. असा एकुण तिन्ही घरातुन एकुण ३,८८,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीं मोहन किसन मोहतुरे वय ४३ वर्ष, रा. नांदोरा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. नेवारे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत

**२) कार भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०६/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नितेश मनीराम बांते वय ३२ वर्ष, रा. बेला याचे घरा समोर राहणारा जखमी प्रदीप वानवास वासनिक वय ५५ वर्ष, रा. बेला हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ७६१८ ने पतसंस्थेची डेली कलेक्शन करिता शहापुर येथे जात असतांनी भंडारा कडुन नागपुर येथे जात असतांनी भंडारा कडुन नागपुर कडे जाणाऱ्या आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपने धोकादायक रित्या चालवुन जखमीचे मोटार सायकलला मागेहुन एमआयटी कॉलेज एनएच—६ येथे धडक मारुन जखमी रोडवर पडल्याने त्याचे डोक्याला व हाताला मार लागुन गंभिर जखमी झाल्याने व घटनेची माहीती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत

**३) संगनमत करुन विटानी डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०६/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे भाऊ शंकर ठवकर यास काहीही कारण नसतांना शिवीगाळ करुन हातात विटा घेवुन विटानी डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी विनोद राजाराम ठवकर वय २५ वर्ष, रा. नेहरुवार्ड देव्हाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक १७/०६/२०१८ चे रात्री १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी वामन रतिराम भगत वय ४४ वर्ष, रा. जगनाडे चौक तुमसर हा अपले पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम २३१४ किंमती ३५,०००/—रु. ने आपले पत्नीसह सांक्षगधाचे कार्यक्रमाला राजाराम लॉन येथे गेले व आपली मोटार सायकल पार्कीग मध्ये लावुन कार्यक्रमाचे ठिकाणी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) कपाळावर व डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १७/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी यास आरोपी याने व्याजाने दिलेले पैसे मागुन तुमचे पैसे परत करण्याची औकात नाही! असे बोलुन फिर्यादीने आरोपी यास तु माझे वडीलाचे पैसे मागीतले आहे, त्याचेशी व्यवहार कर असे बोलला असता यातील आरोपीने शिवीगाळ करुन फियादीचे कपाळावर, डोक्यावर काठीने मारुन जखमी केले व डावे हाताचे पंज्यावर काठीने मारपीट केली अशा फिर्यादी ज्ञानेश्वर रमेश सपाटे वय ३२ वर्ष, रा. शिवनी मोगरा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) अज्ञात वाहन धडकेत तरुणाचा मृत्यु :-**

दिनांक १७/०६/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल क्र. एमच ३६ सी ५७०८ ला बघेडा येथे धडक मारुन मोटार सायकल चा चालक रोहीत धर्मेन्द्र रहांगडाले वय १९ वर्ष, रा. बघेडा यास गंभिर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीयांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जायले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ व भांडण करुन ढकल-ढुकल केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १२/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कैलाश चैतुजी चोपकर वय ३० वर्ष, रा. ब्रम्ही याचा मुलगा रितेश चोपकर वय ५ वर्ष, हा घरासमोर खेळत असतांना आरोपी क्र. १ चा मुलगा आरोपी क्र. २ ला दगडाने मारपीट करुन शिवीगाळ करित असतांना फिर्यादी याने आरोपी क्र. २ यास तु कशाला शिवीगाळ करित आहे, असे हटकले असता यातील आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन फियादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ व तुझा खात्मा करुन टाकु व तुला फसवुन टाकु अशी धमकी दिल्याने फिर्यादीची वहीनी ही भांडण सोडविण्यास आली असता तिला ढकल-ढुकल केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १२/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ५ महिने २७ दिवस ही दिनांक १२/०६/२०१८ ला सकाळी ११.०० वा. दरम्यान आईला सांगीतले की छाती व डोके दुखत असल्याने दिघोरीचे सरकारी दवाखान्यात जाते म्हणुन निघुन गेली होती ती परत न आल्याने आज पावेतो रिस्तेदारीत शोध घेतला असता मिळुन न आल्याने आज रोजी पोस्टे ला येवुन तोंडी तक्रार दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वकेकार पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**९) कारलीच्या जंगलात इसम मिळुन आल्याने मर्ग नोंद . :-**

दिनांक १२/०६/२०१८ ते १८/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रकाश अशोक सराटे वय ३० वर्ष, रा. पौनारखारी हा दिनांक १२/०६/२०१८ ला सकाळी ०९.३० वाजता दरम्यान दारुच्या नशेत निघुन गेला व दिनांक १८/०६/२०१८ रोजी १०.०० वाजता दरम्यान रामलाल टेकाम यांनी सांगीतल्या प्रमाणे कारलीच्या जंगलात मृतक हा फाशी लावलेल्या अवस्थेत दिसुन आला असे फिर्यादी अशोक भोला सराटे वय ५९ वर्ष, रा. पौनारखारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**१०) इसम मृत अवस्थेत मिळुन आला . :-**

दिनांक १५/०६/२०१८ चे आज पावेतो यातील मृतक नरेश गुरुदयाल खेमले वय ४४ वर्ष, रा. राममंदीर वार्ड तुकडोजी पुतळयाचे मागे भंडारा हा दारु पिण्याचे सवयीचा असुन त्याचे डोक्यामध्ये फरक आल्याने तो मनोरुग्न सारखा वागत होता तो घरी कुणाला काहीही न सांगता घरुन निघुन जात असे घटनेवेळी यातील मृतक हा घरी कुणाला न सांगता घरुन निघुन गेला होता फिर्यादी हा त्याचा शोध घेत असता यातील मृतक हा माझा भाऊ असल्याचे ओळखल्याने फिर्यादी आशीष गुरुदयाल खेमले वय ३८ वर्ष, रा. राम मंदीर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १८/०६/२०१८ चे १७.१५ ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी गाडी जुना बसस्टॉप तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भुते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भुते पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक १८/०६/२०१८ चे १८.०० ते १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील इंडीका वाहन बावनकर चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्यांने सरतर्फे फिर्यादी पोना. गुल्हाणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**१२) अवैध हातभट्टी/ देशी दारु व जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १८/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन साकोली, लाखनी व भंडारा येथे हातभट्टी /देशी दारु व जुगार अड्डयावर धाडी घालुन ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०८ लिटर १९० मिली लिटर देशी दारु किंमती २,५८२/–रु. तसेच जुगारातुन किंमती ५,३४५ /–रु. चा असा एकुण किंमती ७,९२७/–रु. माल जप्त करण्यात आला.

**१३ ) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १८/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनाकरीता– ११ ईतर वाहनांवरती – ७४ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.